**ठळक बातम्या**

- उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं बारामतीमध्ये विमान अपघातात निधन, उद्या सकाळी अंत्यसंस्कार

- अजित पवार यांच्या निधनाबद्दल देशभरातून शोक व्यक्त, राज्यात ३ दिवसांचा दुखवटा

- राष्ट्रहिताच्या मुद्द्यावर सरकार पाठिंबा देण्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं अभिभाषणातून आवाहन

**आणि**

- न्यूझीलंड विरुद्धच्या मालिकेतल्या चौथ्या टी-ट्वेंटी सामन्यात नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा भारताचा निर्णय

**<><><><><><>**

राज्याचे उपमुख्यमंत्री, तसंच अर्थ, नियोजन, उत्पादन शुल्क खात्याचे मंत्री, आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांचं आज सकाळी पावणे नऊच्या सुमाराला विमान अपघातात निधन झालं. उद्या सकाळी ११ वाजता शासकीय इतमामात बारामतीमध्ये त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार केले जातील. त्यांच्या निधनानिमित्त राज्य सरकारनं ३ दिवसांचा दुखवटा जाहीर केला असून आज शासकीय सुटीही जाहीर केली होती. राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज बारामतीमध्ये अजित पवार यांचं अंत्यदर्शन घेतलं आणि त्यांच्या कुटुंबियांचं सांत्वन केलं. लोकसभेत आज अजित पवार यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडण्यात आला. तसंच सभागृहाच्या इतर दिवंगत सदस्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करुन कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.

मुंबईहून सकाळी ८ वाजून १० मिनिटांनी त्यांच्या विमानानं उड्डाण केलं. बारामती विमानतळावर उतरण्याआधी दृश्यमानता कमी असल्याची तक्रार वैमानिकांनं केली होती. त्यानंतर पावणे ९ ला विमानाला उतरण्याची परवानगी मिळाली, पण उतरल्यावर लगेच विमानानं पेट घेतला. घटनास्थळाची पाहणी सुरू असून विमानाचा ब्लॅक बॉक्स, वैमानिकाचं संभाषण याची पडताळणी केल्यावर अपघाताचं कारण कळू शकेल, असं पोलिसांनी सांगितलं. विमान अपघात चौकशी ब्युरोच्या पथकानं घटनास्थळाची पाहणी केली असून चौकशी सुरू आहे.

या विमान अपघातात अजित पवार यांच्यासह त्यांचे सुरक्षा रक्षक विदीप जाधव, वैमानिक सुमित कपूर, शांभवी पाठक आणि विमान कर्मचारी पिंकी माळी या सर्वांचं निधन झालं आहे.

अजित पवार यांच्या कारकिर्दीचा थोडक्यात आढावा ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - व्हॉईस कास्ट- गौरी देशमुख - -**

*(राज्याच्या राजकारणात आणि कार्यकर्त्यांमध्ये ‘दादा’ या नावाने लोकप्रिय असलेल्या अजित आशा अनंतराव पवार यांचा जन्म २२ जुलै १९५९ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातल्या देवळाली प्रवरा इथं झाला. १९८२ मध्ये साखर कारखान्याच्या संचालक मंडळावर निवडून आले आणि राजकारणात त्यांचा प्रवेश झाला. दहाव्या लोकसभेत जून १९९१ मध्ये बारामती लोकसभा मतदारसंघातून ते खासदार म्हणून निवडून गेले. पण सप्टेंबरमध्ये त्यांनी खासदारकीचा राजीनामा दिला आणि नंतर ते राज्यातच रमले. दरवेळी बारामती विधानसभा मतदारसंघातून ते मोठ्या मताधिक्यानं विधानसभेत निवडून येत गेले.*

*१९९१ मध्ये राज्यमंत्री म्हणून त्यांनी पहिल्यांदा त्यांचा सरकारमध्ये समावेश झाला. अशोक चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण, उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस या मुख्यमंत्र्यांच्या काळात त्यांनी राज्याचं उपमुख्यमंत्रीपद भूषवलं आहे. राज्याचं अर्थमंत्रीपद भूषवणाऱ्या अजित पवारांनी आतापर्यंत तब्बल ११ वेळा अर्थसंकल्प सादर केला आहे. त्याशिवाय जलसंपदा, ऊर्जा, ग्रामविकास यासारखी खाती त्यांच्याकडे होती.*

*विरोधी पक्षनेते असलेल्या अजित पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही आमदारांना सोबत घेऊन सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला आणि उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस हे पक्षाचं नाव आणि पक्ष चिन्ह त्यांनाच मिळाले.*

*राज्यातल्या सहकार आणि क्रीडा क्षेत्रातल्या अनेक संस्था, संघटनांमध्ये ते कार्यरत होते. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचं अध्यक्षपद १६ वर्ष त्यांच्याकडे होतं. महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक संघटना, महाराष्ट्र खोखो संघटना, राज्य कबड्डी संघटना यांचेही ते दीर्घकाळ अध्यक्ष होते. वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, रयत शिक्षण संस्था, विद्या प्रतिष्ठान याशिवाय विविध साखर कारखाने, सहकारी संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता.*

*स्पष्टवक्तेपणा, वक्तशीरपणा, कामाचा झपाटा, प्रशासन आणि लोकांशी असलेला थेट संपर्क यासाठी अजित पवार विशेष ओळखले जात. सकाळी ६ वाजता कामाला सुरुवात करुन लोकांचे प्रश्न सोडवणे, विविध ठिकाणच्या विकासकामांची पाहणी करणे ही त्यांच्या कामाची आणखी काही वैशिष्ट्यं. त्यामुळंच 'कामाचा माणूस' गेला या शब्दात सर्वत्र त्यांच्या निधनाविषयी हळहळ व्यक्त होत आहे.)*

**<><><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अजित पवार यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. पवार यांच्या निधनाने कधीही भरून न निघणारं नुकसान झालं आहे, असं राष्ट्रपती समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हणाल्या. अजित पवार यांची प्रशासनावर जबरदस्त पकड होती, ग्रामीण भागातलं जीवनमान उंचावण्यात ते अग्रेसर होते, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शोकसंदेशात म्हटलं आहे.

**होल्ड- बाईट - प्रधानमंत्री - २६ सेकंद**

राज्यासह देशभरातून अजित पवार यांना आदरांजली अर्पण केली जात आहे. याविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

*व्हाइस कास्ट*

*पवार यांच्या कुटुंबीयांना, सहकाऱ्यांना आणि समर्थकांना हे दुःख सहन करण्याचं धैर्य मिळो अशी प्रार्थना आचार्य देवव्रत यांनी व्यक्त केली आहे. अजित पवार यांच्या जाण्यानं एक दिलदार मित्र गमावला आहे. राज्याच्या कानाकोपऱ्याची माहिती असलेले, राज्याच्या प्रश्नांची जाण असणारे ते संघर्षशील नेते होते, असं ते मुख्यमंत्री म्हणाले.*

***- - - होल्ड बाईट मुख्यमंत्री - - -***

*अजित पवार यांच्या निधनामुळे मोठा भाऊ गेल्याची भावना उपमुख्यमंत्री एकनाथ **शिंदे** यांनी व्यक्त केली आहे.*

***- - होल्ड बाईट शिंदे - - -***

*अजित पवार यांचं निधन आपल्यासाठी वैयक्तिक आणि रालोआसाठीही मोठं नुकसान आहे, अशी भावना केंद्रीय गृहमंत्री **अमित शाह** यांनी व्यक्त केली. लोकसभेचे सभापती **ओम बिर्ला,** संरक्षण मंत्री **राजनाथ सिंह,** परिवहन मंत्री **नितीन गडकरी,** माहिती आणि प्रसारण मंत्री **अश्विनी वैष्णव, केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले** यांनीही पवार यांना श्रद्धांजली वाहिली.*

*मोठी राजकीय कारकिर्द पुढे असताना अजित पवार यांचं असं जाणं हे अकाली नुकसान आहे, अशा शब्दात काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष **मल्लिकार्जुन खरगे** यांनी शोकभावना व्यक्त केली. लोकसभेतले विरोधी पक्षनेते **राहुल गांधी** यांनी अजित पवार यांचं निधन अत्यंत वेदनादायक आहे, अशी भावना व्यक्त केली.*

*अजित पवार मनात येईल ते बोलायचे तरी ते दीर्घद्वेषी नव्हते. राजकारणात त्यांनी वेगळा मार्ग स्वीकारला, तरी त्यांनी संबंध तुटू दिले नाहीत, अशा शब्दात माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. सध्याच्या राजकारणात जातपात न मानता राजकारण करण्याचं धारिष्ट्य दाखवणारेच नेते कमी उरलेत, त्यात अजित पवार हे अग्रणी होते हे नक्की अशी प्रतिक्रिया मनसे अध्यक्ष **राज ठाकरे** व्यक्त केली आहे.*

*राज्याचे नेतृत्व करत असताना अजित पवार यांनी संस्थात्मक बांधणी केली, नेतृत्वाची पुढील पिढी घडवली आणि सहकार क्षेत्राच्या माध्यमातून ग्रामीण विकासावर विशेष भर दिला, असं काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासह राज्यासाठी हा काळा दिवस असल्याची प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी दिली आहे. तर प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी कुटुंबप्रमुख गमावल्याची भावना व्यक्त केली आहे. राज्याच्या राजकीय, सार्वजनिक जीवनाला अजित पवार यांच्याकडून अजून मोठ्या कार्याची अपेक्षा असतानाच अशा प्रकारे त्यांचं अपघाती निधन आम्हा सर्वांच्या राजकीय जीवनात एक कायमस्वरूपी पोकळी निर्माण करून गेलं आहे, अशी भावना माजी मंत्री **जयंत पाटील** यांनी व्यक्त केली.*

*देशातल्या इतर राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी तसंच विविध क्षेत्रातल्या मान्यवरांनी पवार यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.*

<><><><><>

अजित पवार यांच्या अपघाती मृत्यची सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी व्हावी अशी मागणी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केली आहे. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह अनेक विरोधी पक्षनेत्यांनी या मागणीला पाठिंबा दिला आहे.

<><><><><>

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणाने प्रारंभ झाला. संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर केलेल्या अभिभाषणात राष्ट्रपतींनी विकसित भारताचं उद्दिष्ट गाठण्यासाठी सामूहिक निर्धाराची गरज असल्याचं सांगितलं. संसदेतल्या सर्व सदस्यांनी राष्ट्रहिताच्या प्रश्नांवर सरकारला साथ द्यावी असं आवाहन त्यांनी केलं. सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळात २५ कोटी जनतेला दारिद्र्यरेषेच्या वर आणण्यात सरकारला यश मिळाल्याचं त्या म्हणाल्या.

यावेळी राष्ट्रपतींनी गेल्या वर्षभरातल्या सरकारच्या कार्याचा आढावा घेताना कृषी उत्पादनात झालेली मोठी वाढ, नवीन कामगार कायदे, नौकानयन क्षेत्रातल्या जुन्या कायद्यांमधले बदल, नक्षलवाद उच्चाटनातली प्रगती, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात ३५ लाखाहून अधिक रोजगार निर्मिती, इत्यादी ठळक मुद्द्यांचा उल्लेख केला.

<><><><><>

तरुणांमध्ये आत्मविश्वास आणि शिस्त निर्माण करून त्यांना देशासाठी समर्पित असलेले नागरिक बनवण्याचं काम एनसीसी करते, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते नवी दिल्ली इथं वार्षिक एनसीसी रॅलीत बोलत होते. भारतीय तरुणांकडे कौशल्य आणि संस्कृती आहे, त्यामुळे जग त्यांच्याकडे मोठ्या विश्वासाने पाहते असं प्रधानमंत्री म्हणाले. गेल्या काही वर्षांत एनसीसीचं सामर्थ्य १४ लाखांवरून वाढून २० लाख झालं आहे, यात मुलींचं प्रमाणही वाढलं आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

यावेळी त्यांनी विविध पुरस्कार प्रदान केले. त्यात राज्यातल्या तनु भान हिला गौरवण्यात आलं.

**<><><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला चौथा सामना आज विशाखापट्टणम इथं होत आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा न्यूझीलंडच्या दोन षटकात बिन बाद २६ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><><>//**